वर्ष : ०४ | अंक: ३७ | मुंबई, मंगळवार ७ ऑगस्ट २०१८ ते १३ ऑगस्ट २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 रेल्वेसाठी मुंबई महत्त्वाची आहे का?

3 → मराठा आरक्षणाला आर्थिक निकषाचा फाटा

...तर भाजपच्या हिंमतीची डी.एन.ए. चाचणी करावी लागेल ← 4




## नोव्हेंबर संपण्यापूर्वी मराठा आरक्षणाची वैधानिक प्रक्रिया पूर्ण करणार - मुख्यमंत्री



## आरक्षण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत 'मेगाभरती'ला स्थगिती

***मुंबई–*** *नोव्हेंबर महिन्यापर्यंत मराठा आरक्षणाबातची सर्व वैधानिक प्रक्रिया राज्य सरकार पूर्ण करेल. मराठा समाजाचा आरक्षणाचा प्रश्न सुटेपर्यंत 'मेगाभरती'ला स्थगिती देण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. दूरदर्शनच्या सहयाद्री वाहिनीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील जनतेशी संवाद साधला. 'मेगाभरतीच्या निर्णयामुळे मराठा समाजाला असे वाटते की आपल्यावर अन्याय झाला. मात्र मेगाभरतीची प्रक्रिया आम्ही सुरू केलेली नाही आणि अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, मराठा अशा सर्वांचे हित कायदेशीरपणे जपल्याशिवाय मेगाभरती सुरू केली जाणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.*



### मुख्यमंत्र्यांच्या भाषणातील मुद्दे :-

- उशिरात उशीरा मराठा समाजाला आरक्षण देण्यासंबंधीची संपूर्ण वैधानिक कारवाई नोव्हेंबर अखेरीसपर्यंत पूर्ण झाली पाहिजे, अशी भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. त्यादृष्टीने राज्य सरकारने कारवाई प्रारंभ केली आहे
- मेगाभरतीच्या निर्णयामुळे मराठा समाजाला असे वाटते की आपल्यावर अन्याय झाला. मी पुन्हा एकदा स्पष्ट करतो की, मेगाभरतीची प्रक्रिया आम्ही सुरू केलेली नाही आणि अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, मराठा अशा सर्वांचे हित कायदेशीरपणे जपल्याशिवाय, मेगाभरती सुरू केली जाणार नाही
- रयतेच्या स्वाभिमानाची, मालमत्तेच्या रक्षणाची भूमिका छत्रपती शिवाजी महाराजांची होती. छत्रपतींच्याच विचारांवर राज्य चालविण्याची आपली परंपरा. आता संघर्ष पुरे झाला. आपण सारे एकत्र येऊन शिवछत्रपतींचा महाराष्ट्र एकसंध ठेऊ या. या पुरोगामी महाराष्ट्राला सर्व मिळून पुढे नेऊ.
- राजकीय कुरघोडी करण्याऐवजी या व्यवस्थेचे एक घटक म्हणून एकत्रित येऊन या प्रश्नाला न्याय देण्याची भूमिका प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे. हे आवाहन गांभीर्याने घेऊन, संवादाची प्रक्रिया पुढे नेली पाहिजे.
- संवेदनशील नेत्यांनी नेतृत्त्व करणे सोडले तर संपूर्ण समाज दिशाहिन होईल. मार्ग संवादातून निघणे शक्य. सरकार संवादासाठी सदैव तयार, कटिबद्ध आहे. हा प्रश्न राजकारणात अडकविण्याचा नाही, प्रतिस्पर्धेसाठी वापरण्याचा नाही. असे झाले तर महाराष्ट्र आपल्याला कधीही माफ करणार नाही.
- गुंतवणूक - रोजगार निर्मितीसाठी शांतता महत्त्वाची. अशात चाकण आणि औरंगाबादमधील घटना अतिशय दुर्दैवी. याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज.



## नोकऱ्याच नसतील तर आरक्षणाचा काय उपयोग?

**नवी मुंबई- जर सरकार नव्या नोकऱ्या निर्माण करणार नसेल तर आरक्षण मिळून देखील काय उपयोग होणार? असा उद्विग्न सवाल राज ठाकरे यांनी केला. केंद्र आणि राज्यातील भाजप सरकारवर त्यांनी सडकून टीका केली. महत्त्वाच्या मुद्यांवर लक्ष देण्याऐवजी पंतप्रधान मोदी योगा करतात, असा टोलाही त्यांनी लगावला. महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेनेच्या मेळाव्यात ते बोलत होते.**

टाइम्स ऑफ इंडियाच्या एका बातमीनुसार, देशभरात एकूण २४ लाख जागा भरल्याचा नाहीत. देशात नोटाबंदीनंतर सुमारे साडेतीन कोटी लोकांचा रोजगार हिरावला गेला आहे. एकतर जागा भरायला सरकारकडे पैसे नाहीत किंवा सरकारला काम करायचं नाही. जर सरकारी नवीन नोकऱ्या निर्माण होणार नसतील, तर आरक्षण मिळून देखील काय फायदा?

***७५०० मराठी मुलांवर गुन्हे***

मराठा आरक्षणासाठी जे आंदोलन सुरु आहे, त्यात जवळपास ७५०० मराठी मुलांवर कलम ३०७ च्या खाली गुन्हे दाखल झालेत. उद्या आरक्षण दिलंच तर ह्या मुलांच्या नावावर गुन्हे आहेत म्हणून त्यांना नोकरी मिळणार नाही. मराठी मुलांची मनं भडकवायची, त्यांना रस्त्यावर उतरवायचं हे किती काळ चालणार आहे?

***महाराष्ट्राला बदनाम करू नका***

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी झालेल्या आंदोलनानंतर अटक झालेल्यांमध्ये परप्रांतीयदेखील होते, आंदोलन करताना महाराष्ट्र बदनाम होऊ देऊ नका, असे आवाहन राज ठाकरे यांनी मराठा आंदोलकांना केले.

### ठाणे पोलिसांची मोठी कामगिरी

## चाईल्ड पॉर्नोग्राफी करणाऱ्या टोळीला अटक

### गेल्या काही दिवसांमध्ये चाईल्ड पॉर्नोग्राफीची मागणी सातत्याने वाढत आहे

**ठाणे-** ठाणे पोलिसांनी सोशल मीडिया आणि व्हॉट्सअपवर चाईल्ड पॉर्नोग्राफी करणाऱ्या टोळीला अटक केली आहे. ही टोळी मुंबईसह देशभरात वेगवेगळ्या राज्यांमध्ये व्हॉट्सअप ग्रुप तयार करुन बंदी घातलेल्या चाईल्ड पॉर्नोग्राफीचे व्हिडिओ व्हायरल करायचे. महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे, या ग्रुपमधील लोक हे अल्पवयीन आहेत किंवा १८ ते २५ वयोगटातील आहेत. या ग्रुपमध्ये २५० हून जास्त मेंबर्स आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये चाईल्ड पॉर्नोग्राफीची मागणी सातत्याने वाढत आहे. यातून तगडी कमाईही केली जाते. आठ जणांनी मिळून हा ग्रुप तयार केला होता. ठाणे पोलिसांनी या आठही आरोपींना अटक केले आहे. भारतात चाईल्ड पॉर्नोग्राफीवर बंदी घालण्यात आली आहे. पण तरीही भारतात चाईल्ड पॉर्नोग्राफीचे व्हिडिओ अनैतिक पद्धतीने डाऊनलोड केले जातात, शिवाय व्हॉट्सअपवर शेअर करुन मोठी कमाई केली जाते. ठाणे पोलिसांच्या मते, पकडण्यात आलेल्या गुन्हेगारांपैकी एक आरोपी ही हॅकर आहे. तसेच डार्कनेटवरुन तो अश्लिल व्हिडिओ डाऊनलोट करतो आणि ग्रुपच्या मुख्य व्यक्तीला हे व्हिडिओ पुरवण्याचे काम करतो. या ग्रुपच्या तीन मुख्य सदस्यांनी चार व्हॉट्सअप ग्रुप बनवले



असून त्यात हे व्हिडिओ मोठ्या प्रमाणात शेअर केले जातात. या चार व्हॉट्सअप ग्रुपमध्ये कॉलेजला जाणारी अनेक तरुण मुलं आहेत. तसेच अल्पवयीन, कमी शिकलेली मुलंही या ग्रुपमध्ये आहेत. तसेच मानसिक विकृती असलेले ३० वर्षांपर्यंतची मुलंही आहेत. येत्या काळात चाईल्ड पॉर्नोग्राफी व्हिडिओच्या आहारी गेलेल्या मुलांची चौकशी ठाणे पोलीस करणार आहे. चाईल्ड पॉर्नोग्राफीवर आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाईत ठाणे पोलिसांची ही सर्वात मोठी कार्यवाई मानण्यात येते. आतापर्यंत मीरा रोड, भाईंदर, वसई, विरार या ठिकाणांहून पाच लोकांना अटक करण्यात आली आहे.

### इंडोनेशियामध्ये पुन्हा भूकंपाचे धक्के

## त्सुनामीचाही इशारा



**इंडोनेशिया-** इंडोनेशियामध्ये नुकतेच पुन्हा भूकंपाचे तीव्र धक्के बसले असून लोम्बोक आयलँडवर ते धक्के मोठ्या प्रमाणात जाणवले. या धक्क्यांची तीव्रता ७ रिश्टर स्केल इतकी होती. तर या भूकंपाची खोली १०.५ किलोमीटर असल्याचे समजले आहे. या भूकंपाचे धक्के इतके तीव्र होते की ते बाली द्विपसमूहापर्यंत जाणवले होते. आता आलेल्या भूकंपाच्या धक्क्यांनंतर इंडोनेशिया आणि आसपासच्या भागात त्सुनामी येण्याची शक्यताही वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

कोणतीही जिवीत हानी झाल्याचे वृत्त आलेले नाही. काही दिवसांपूर्वी इंडोनेशियातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या लोम्बोक येथे ६.४ रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता. ३० जुलै रोजी झालेल्या या भूकंपात काही प्रमाणात नुकसान झाले होते. त्यामध्ये १४ लोकांनी प्राण गमावले होते. तर जवळपास १६० लोक जखमी झाले होते. त्यावेळी झालेल्या भूकंपाने १ हजारहून अधिक घरे उध्वस्थ झाली होती.

### सौजन्य व्हॉट्सअप




## भाईंदर पोलिसांची धडक कारवाई


### धोकादायक काम करणाऱ्या बाल कामगाराची केली सुटका

**भाईंदर –** भाईंदर पो.ठाणे अंतर्गत गणेश देवलनगर, गाळा नं.१८ या कारखाण्यामध्ये कारखाना चालक हा अल्पवयीन मुलांना अनधिकृतपणे कामावर ठेवुन त्यांच्याकडुन सक्तीने बेकायदेशीर पणे धोकादायक कामे करुन घेत आहे अशी माहीती मिळाल्यावरुन श्री अतुल कुलकर्णी, सहा.पोलीस अधीक्षक, भाईंदर विभाग,यांनी सदर बातमीची शहानिशा करुन कारवाई करण्याबाबत सपोनि श्री शिंदे, नेम. अ.मा.वा.शा.ठाणे ग्रामीण यांना सुचना दिल्या होत्या. दि.०२.०८.२०१८ रोजी १९.३० वा. चे सुमारास सपोनि श्री शिंदे,नेम. अ.म.व.शा. यांनी पंच व पोलीस पथकासह वर नमुद ठिकाणी छापा टाकाला असता सदर ठिकाणी इसम नामे मनबहादुर गंगाधर यादव, वय ४२ वर्षे, यांने मुलगा नामे मोनु रामसुमेर यादव, वय १५ वर्षे, यास तो अल्पवयीन असल्याचे माहीत असताना



सुध्दा त्यास शेगडीवर चकली तळण्याचे धोकादायक काम व इतर श्रमाची कामे करुन घेवुन तसेच सदर बालकामगारास कामावर ठेवुन त्याचे इच्छेविरुध्द काम करण्याची सक्ती करुन व त्याचे उत्पन्न स्वत: वापरुन बाल/किशोर कामगारा कडुन मानसिक व शाररिक त्रासाचे काम करुन घेताना आढळून आला आहे. नमुद बाल/किशोर कामगाराची सुटका करुन सदर बाबत भाईंदर पो.ठाणे गुरनं. I३०१/२०१८ कलम ३७४ भादविस सह कलम ३(ए) बाल मजूरी (मनाई व नियम) सुधारीत कायदा २०१६,सह कलम ७५,७९ बाल न्याय अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असुन पुढील तपास भाईंदर पो.ठाणेकडुन चालु आहे.

वरील कारवाई मा.डॉ.महेश पाटील,पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामीण, श्री प्रशांत कदम,अपर पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामीण यांचे मार्गदर्शनखाली व मा. श्री अतुल कुलकर्णी, सहा.पोलीस अधीक्षक,भाईंदर विभाग यांचे सुचनांन्वये सपोनि श्री शिंदे,मपोना/१७८९ यंबर, पोहवा/२१८८ इंगळे,पोवा/२२६९ पाटील,पोना/२२७१ चासकर, सर्व नेम.अ.म.व.शा. पोना/१८४२ जाधव,पोना/१०२५ जी.बी.जाधव, नेम.उविपोअ. भाईंदर विभाग,यांनी पार पाडली आहे.



# रेल्वेसाठी मुंबई महत्त्वाची आहे का?

**मुंबई- मुंबईसाठी रेल्वे महत्त्वाची आहे, परंतु रेल्वेसाठी मुंबई महत्त्वाची आहे का, असा संतप्त सवाल उच्च न्यायालयाने गुरुवारी रेल्वे प्रशासन आणि केंद्र सरकारला केला. मुंबईच्या जीवनवाहिनीविषयी उदासीन असलेल्या दोन्ही यंत्रणांच्या भूमिकेचा समाचार घेताना प्रवाशांच्या जिवाशी खेळणे आता तरी थांबवा, असे न्यायालयाने बजावले. तसेच प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रेल्वेच्या पूर्व-पश्चिम भागांना जोडणारे पादचारी पूल, रेल्वे मार्गावरून जाणाऱ्या उड्डाणपुलांची तातडीने संरचनात्मक पाहणी करा आणि त्यांची दुरुस्ती करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.**

गेल्या वर्षी एल्फिन्स्टन स्थानकातील पादचारी पुलावर झालेली चेंगराचेंगरीची घटना, नुकताच अंधेरी स्थानकानजीकच्या पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या गोखले उड्डाणपुलाच्या पदपथाचा काही भाग कोसळल्याने झालेला अपघात तसेच दररोज रेल्वे अपघातात होणारे मृत्यू याबाबत स्वतंत्र याचिका करण्यात आली आहे. न्यायमूर्ती नरेश पाटील आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी सुनावणी झाली. त्या वेळी न्यायालयाने मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या रेल्वे सेवेबाबत उदासीन असलेले रेल्वे प्रशासन आणि केंद्र सरकारला धारेवर धरले. निधीच्या कारणास्तव प्रवाशांच्या जिवाशी खेळू नका, असे बजावत रेल्वेच्या पूर्व-पश्चिम भागांना जोडणारे पादचारी पूल, रेल्वे मार्गावरून जाणारे उड्डाणपूल यांची तातडीने संरचनात्मक पाहणी करा आणि त्यांची आवश्यकतेनुसार दुरुस्ती, रुंदीकरण, पुनर्बांधणी करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईच्या जीवनवाहिनीची स्थिती सुधारण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याची वेळ आली आहे, याचाही न्यायालयाने या वेळी पुनरुच्चार केला.

पश्चिम रेल्वेवरील वांद्रे स्थानकाच्या पादचारी पुलाच्या रुंदीकरणाच्या कामासाठीची निविदा प्रक्रिया २००६ साली पूर्ण करून त्यानंतर वर्षभरात हा पूल बांधून पूर्ण करण्याचे रेल्वे प्रशासनाने जाहीर केले होते. अद्याप रेल्वे प्रशासनाने काहीही केलेले नाही. त्याबाबतही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.

# मेट्रो प्रवाशांची ऑनलाइन तिकिटाला पसंती

**मुंबई- मुंबई- घाटकोपर-वर्सोवा या मेट्रो-१ मार्गावर दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी ऑनलाइन मोबाइल तिकिट प्रणालीला पसंती दिली आहे. दीड महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या 'स्कीप क्यू' या तिकीटप्रणालीचा वापर सुमारे २५,००० प्रवासी करीत आहेत. टोकन तिकीट आणि मासिक पास काढणाऱ्या प्रवाशांपैकी ६ टक्के प्रवाशांनी 'स्कीप क्यू' प्रणालीचा अवलंब केल्याची माहिती मेट्रो-१ प्रशासनाने दिली आहे. यामधील ७० टक्के प्रवासी 'पेटीएम'द्वारे तिकीट दर भरून प्रवास करीत आहेत.**

मुख्य म्हणजे या मार्गावरील प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता त्यावर उतारा म्हणून मेट्रोला आणखी दोन डब्बे जोडण्यासंदर्भातील विचारणा 'मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'ने एमएमआरडीए'मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड'कडे एमएमओपीएल केली आहे.




गेल्या काही वर्षात घाटकोपर-वर्सोवा या मेट्रो-१ मार्गाला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. घाटकोपर रेल्वे स्थानकासह पश्चिम द्रुतगती मार्ग आणि अंधेरी रेल्वे स्थानकाला मेट्रो-१ ची मार्गिका जोडते. त्यामुळे वर्षागणिक या मार्गावर प्रवाशांच्या संख्येत वाढ होत आहे. या मार्गिकेवरून दररोज सुमारे ३ लाख ४० हजार प्रवासी प्रवास करीत आहेत. २०१७-१८ या कालावधीत या मार्गिकेवरील प्रवासी संख्येमध्ये १३ टक्क्यांनी वाढ झाली असून येत्या काही दिवसांमध्ये प्रवासी संख्या चार लाखांच्या घरात पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रवाशांचा सोयीसाठी गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात मेट्रो-१ प्रशासनातर्फे 'स्क्रीप क्यू' या ऑनलाइन मोबाइल तिकीटप्रणालीचा प्रारंभ करण्यात आला होता. केवळ दिवसभराचे तिकीट काढण्याची सोय यामध्ये असल्याने सुरुवातीचा काळात या प्रणालीला प्रवाशांचा थंड प्रतिसाद मिळाला. मात्र जून महिन्यामध्ये या प्रणालीत मासिक पासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यानंतर टोकन आणि मासिक पास वापरणारे अनेक प्रवासी याकडे वळले आहेत. मेट्रो-१ प्रशासनाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार सुरुवातीच्या काळात केवळ ३,५०० प्रवासी या प्रणालीचा वापर करून मोबाइल तिकीट मिळवीत होते. मात्र आता सुमारे २५,००० प्रवासी याचा वापर करीत असून पूर्वी टोकन तिकीट काढून प्रवास करणाऱ्यांपैकी १० टक्के प्रवासी या प्रणालीचा वापर करीत आहेत. या १० टक्क्यांपैकी ८० टक्के प्रवासी हे 'पेटीएम'द्वारे तिकिटाचे पैसे भरीत आहेत. तसेच रेल्वेच्या 'स्माट कार्ड'च्या धर्तीवर येत्या ६ ऑगस्टपासून 'स्टोर व्हॅल्यू पास'ची सुविधा ग्राहकांना उपलब्ध होण्याची शक्यता आहे. याद्वारे कार्डमध्ये आगाऊ स्वरूपात पैसे भरून तिकीट काढल्यानंतर त्यामधून पैसे कमी होणार आहेत.

# रिक्षा–टॅक्सी भाडेवाढ होणार?

**मुंबई-** रिक्षा-टॅक्सीच्या प्रवास भाड्यात वाढ होण्याची शक्यता आहे. १० ऑगस्ट रोजी मुंबई महानगर परिवहन प्राधिकरण व राज्य परिवहन प्राधिकरणाची बैठक होणार आहे. या बैठकीत भाडेवाढीसंदर्भात निर्णय होईल, अशी माहिती परिवहन विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याकडून देण्यात आली. रिक्षा व टॅक्सी भाडे दरात प्रत्येकी दोन रुपयांनी वाढ करण्याचा विचार केला जात आहे.

गेल्या तीन वर्षांत रिक्षा-टॅक्सीच्या भाड्यात वाढ झालेली नसून सीएनजीच्या दरांत मात्र वाढ होत आहे. तसेच जीवनावश्यक खर्चातही वाढ होत असून रिक्षा-टॅक्सी चालकाना आर्थिक फटका बसत आहे. दोन वर्षांत सीएनजीचे दर प्रति किलो तीन रुपयांनी वाढले असून त्याचा विचार करता भाड्यात वाढ करावी, अशी मागणी रिक्षा-टॅक्सी संघटनांकडून वारंवार करण्यात येत आहे. ही मागणी पाहता प्रत्येकी दोन रुपयांनी वाढ करण्याचा विचार केला जात आहे. भाडेवाढ झाल्यास रिक्षाचे दीड किलोमीटपर्यंत असलेले १८ रुपये भाडे २० रुपये आणि टॅक्सीचे



२२ रुपये असलेले भाडे २४ रुपये होईल. त्यानंतरच्याही टप्प्यात वाढ होणार आहे.

१० ऑगस्ट रोजी मुंबई महानगर परिवहन प्राधिकरण व राज्य परिवहन प्राधिकरणाची बैठक होणार असून यामध्ये भाडेवाढीचाही विषय आहे. परिवहन मंत्री, परिवहन सचिव, परिवहन आयुक्त, आरटीओ अधिकारी या बैठकीला उपस्थित असतील. बैठकीत भाडेवाढ लागू करावी कि नाही, लागू केल्यास ती किती असावी, शेअर रिक्षा व टॅक्सी दरही किती असावेत असे अनेक मुद्दे चर्चेला असतील. रिक्षा-टॅक्सी भाडे दर ठरवण्यासाठी राज्य शासनाकडून एक वर्षांपूर्वी चार सदस्यांची खटुआ समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्याही शिफारसीही शासनाने स्विकारलेल्या नाहीत. त्याआधी हकिम समिती शासनाने नेमली होती. खटुआ समिती अद्याप स्विकारलेली नसल्याने शासनाकडून भाडेवाढीसाठी हकिम समितीचाच विचार केला जाणार का असा प्रश्न आहे.

# महात्मा फुले योजनेतून ३५ रुग्णालये बाद

**मुंबई-** रुग्णांकडून पैसे उकळणे, नोंदीमध्ये अफरातफर, कमी प्रतिसाद आदी कारणांमुळे राज्यभरातून ३५ रुग्णालयांना 'महात्मा फुले जनआरोग्य योजने'तून बाद करण्यात आले असून नव्या ३२ रुग्णालयांचा यात नव्याने समावेश करण्यात आला आहे. यात मुंबईतील तीन रुग्णालयांचा समावेश आहे. या रुग्णालयांमध्ये रुग्णांना स्वस्तात वैद्यकीय उपचार उपलब्ध होऊ शकतील. राज्यभरात 'महात्मा फुले जनआरोग्य योजने'अंतर्गत एका कुटुंबाला दीड लाखापर्यंतचा वैद्यकीय खर्च मिळण्याची सुविधा असून यामध्ये ९७१ प्रकारच्या शस्त्रक्रियांचा समावेश केला आहे. या योजनेअंतर्गत सुमारे



४५० रुग्णालये सहभागी आहेत. यातील ३५ रुग्णालयांची मार्च महिन्यापासून चौकशी सुरू होती. यामध्ये सुरुवातीला आठ रुग्णालये दोषी आढळल्याने जून महिन्यातच या योजनेतून त्यांना बाद करण्यात आले. मुंबई, जळगाव, अकोला, औरंगाबाद, चंद्रपूर, नागपूर, सोलापूर आणि वाशिममधील रुग्णालयांचा यात समावेश होता. यामध्ये भायखळा येथील बालाजी रुग्णालयही असून रुग्णांच्या आजारांचे निदान चुकीचे करणे, बिलांमध्ये फुगवटा दाखवणे, खोटे वैद्यकीय अहवाल सादर करणे आदी बाबी तपासणीदरम्यान आढळून आल्या होत्या.

# पोलीसदीदींनी शाळेत शिकवला 'बॅड टच' अन् बापाला झाली अटक!




**मुंबई** - अल्पवयीन मुलं असो कि चिमुकली मुलं त्यांच्या निरागसतेचा फायदा घेऊन त्यांच्यावर लैंगिक शोषण कारण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अश्लिल कृत्य करणाऱ्या नराधम बापाचं बिंग पोलिसदीदी उपक्रमामुळे उघड झालं आहे. पोलिसदीदी कार्यक्रमाअंतर्गत अल्पवयीन मुलींना 'गुड टच आणि बॅड टच' ची माहिती दिली जाते. या माहितीच्याआधारे मुलीला वडिलांकडून अशा प्रकार होणाऱ्या शोषणाची माहिती पोलिसांना दिल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघड झाला आणि आग्रीपाडा पोलिसांनी आरोपीला बापाला बेड्या ठोकल्या आहेत. आग्रीपाडा परिसरात पिडित तरुणी कुटुंबासह राहते. पिडीत मुलगी त्याच परिसरातील एका शाळेत दहावीचे शिक्षण घेत आहे. दरम्यान, मुंबईत अल्पवयीन मुलींच्या निरागसतेचा फायदा घेऊन त्यांच्याशी अश्लील चाळे करण्याचे प्रमाण वाढले होत. या गुन्ह्यांच प्रमाण कमी करण्यासाठी राज्यातील प्रत्येक शाळेत आठवड्यातून एकदा 'पोलिसदीदी' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा उद्देश हा अल्पवयीन मुला - मुलींना त्यांना चुकीच्या पद्धतीने हात लावणाऱ्यांपासून सावध करणे आहे. तसेच त्यांना लैंगिक शोषणापासून वाचविणे हा आहे. त्यानुसार पिडीत मुलीचा शाळेत काही महिला पोलिसांना पाठवून मुलींना गुड टच आणि बॅड टचची माहिती पोलिसांनी दिली.

# शांतता क्षेत्रांच्या नावाने ठणठणाट

**मुंबई- सण-उत्सवांच्या दणदणाटावरून राज्य सरकारबरोबरच स्थानिक प्रशासन संस्थांना धारेवर धरणाऱ्या उच्च न्यायालयाकडून मुंबई महानगरपालिकेला पुन्हा एकदा कान उपटून घ्यावे लागणार आहेत. न्यायालयाने नव्या नियमावलीनुसार किती ठिकाणी शांतता क्षेत्रे निश्चित झाली आहेत याचा अहवाल मागवला आहे. मात्र वर्षभर काम केल्यानंतरही मुंबई महापालिका केवळ ११० शांतता क्षेत्रे निश्चित करू शकली आहे. गेल्या वर्षी ही संख्या तब्बल १११७ होती.**

महत्त्वाचे म्हणजे ध्वनिप्रदूषण नियंत्रणाचा कायदा आल्यावर २००९ मध्ये पालिकेने सामाजिक संस्थांच्या मदतीने एका आठवड्यात शहरातील १११७ ठिकाणे शांतता क्षेत्र निश्चित केली होती. त्यानंतर गेल्या वर्षीपर्यंत त्यांची संख्या १५३७ पर्यंत वाढली होती. पण या वर्षी हे काम चांगलेच रखडल्याचे दिसते आहे. उरलेल्या ठिकाणांची





नोंदणी करण्यासाठी पर्यावरण विभागाकडून संबंधित वॉर्डकडे पत्रे पाठवण्यापर्यंतच मजल गेल्याने दहीहंडी व गणेशोत्सवाआधी शांतता क्षेत्रांची यादी वाढणार नसल्याचे निश्चित झाले आहे.

केंद्राच्या ध्वनिप्रदूषण नियंत्रण नियमांनुसार शाळा, महाविद्यालय, धार्मिक स्थळे, न्यायालय तसेच रुग्णालयाच्या १०० मीटर परिसर शांतता क्षेत्र म्हणून घोषित करणे बंधनकारक आहे. या क्षेत्रांमध्ये ध्वनिक्षेपक लावण्यास बंदी असल्याने दहीहंडी, गणेशोत्सव मंडप उभारणे बेकायदेशीर ठरते. त्यामुळे काही ठिकाणे शांतता क्षेत्रांच्या यादीतून वगळण्यासाठी प्रशासन व राज्य सरकारवर सातत्याने दबाव येत होता. त्यात गेल्या वर्षी १० ऑगस्ट रोजी राज्य सरकारने त्यांच्या मान्यतेशिवाय शहरात शांतता क्षेत्र घोषित करता येणार नसल्याचा नियम करत महापालिकेकडे २०१५ पर्यंत नोंद झालेल्या १५३७ शांतता क्षेत्रांवर एका दिवसात काट मारली. पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार नागरिकांकडून सूचना व हरकती न मागवता शांतता क्षेत्रांवर काट मारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शहरात शांतता क्षेत्र निश्चित नसणे हे योग्य नाही, असे सांगत उच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या निर्णयाला स्थगिती दिली. मात्र सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय स्थगित केला.

# गणेशोत्सवापूर्वी शहरातील खड्ड्यांची समस्या निकाली काढणार

**मुंबई-** गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी मुंबई शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांची समस्या दूर केली जाणार आहे. याबाबत महापालिका आयुक्तांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. येत्या शनिवापर्यंत याबाबतचा अहवाल प्राप्त होणार असून त्यानंतर खड्ड्यांचा प्रश्न निकाली काढला जाणार असल्याची माहिती उद्योगमंत्री तसेच मुंबईचे पालकमंत्री सुभाष देसाई यांनी दिली. गणेशोत्सव पूर्वतयारीच्या अनुषंगाने उद्योगमंत्री तथा पालकमंत्री सुभाष देसाई यांच्या दालनात आज बैठक घेण्यात आली. गणेशाचे आगमन आणि विसर्जन आदी मुद्द्यांवर या वेळी साधकबाधक चर्चा करण्यात आली. गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मांडलेल्या सूचनांवर या वेळी चर्चा करण्यात आली. या वर्षापासून गणेश मंडळांना ऑनलाइन नोंदणीची सक्ती करण्यात आलेली आहे. त्यावर काहींनी सूचना कळवल्या. ऑनलाइनसोबत ऑफलाइन पद्धतीने नोंदणी करण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान, देसाई म्हणाले, ऑनलाइन पद्धत योग्य असून यामुळे एकाच ठिकाणी पोलीस, महापालिका, अग्निशमन दलाचा परवाना प्राप्त होणार आहे. ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी मंडळाच्या प्रतिनिधींना वॉर्डनिहाय प्रशिक्षण देण्याची तयारी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी या वेळी दर्शविली. त्याला सर्वांनी सहमती दिली. रस्त्यावरील खड्ड्यांच्या बाबतीत देसाई म्हणाले, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी शहरातील सर्व खड्ड्यांचा अहवाल तयार करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. आठवडाभरात कारवाईचा अहवाल सादर केला जाणार आहे. येत्या शनिवारी अहवाल येणार आहे. त्यावर चर्चा करून उर्वरित कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.



# घरांच्या किमती वाढणार

**मुंबई-** मुंबईसह महानगर प्रदेशात एमएमआर हजारो कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या मोनो, मेट्रो, पारबंदर, सागरी सेतूसारख्या पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी लागणारा निधी उभारण्यासाठी एक टक्का अधिभार लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. याबाबतचा अध्यादेश काढण्यासाठीचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळासमोर पाठविण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्याचा परिणाम घरांच्या दरांवर होणार आहे. राज्यात सध्या मुंबईसह, नवी मुंबई, पुणे, नागपूर आदी शहरांत मेट्रो प्रकल्पांची कामे जोरात सुरू आहेत. महानगर प्रदेशात सध्या मेट्रो, मोनोरेल, बस रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टीम, पूर्व मुक्त मार्ग, पारबंदर मार्ग, सागरी सेतू आदी पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे सुरू आहेत. त्यातही मुंबईसोबतच ठाणे, नवी मुंबई, कल्याण, मीरा रोड या शहरांमध्येही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुमारे दीड लाख कोटी रुपये खर्चाचे पायाभूत सुविधा प्रकल्प राबविले जात असून त्यातही केवळ मेट्रो प्रकल्पांचा खर्च ८० हजार कोटींच्या घरात आहे. राज्य विधिमंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात अधिभाराबाबत मुंबई महापालिका प्रांतिक अधिनियमात सुधारणा करणारे विधेयक सरकारने मंजूर करण्याचा प्रयत्न केला.



मात्र विधिमंडळात हे विधेयक संमत होऊ न शकल्याने आता अध्यादेशाच्या माध्यमातून अधिभार लागू केला जाणार असून त्याबाबतचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येणार असल्याचे मंत्रालयातील उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले. नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिलने मात्र सरकारच्या या निर्णयास विरोध केला आहे. जीएसटी लागू करताना सरकारने कोणताही अन्य कर लागणार नाही असे स्पष्ट केले होते.

# मोटार बाइक ॲम्ब्युलन्समुळे मुंबईत ३५७४ रुग्णांना जीवनदान

**मुंबई-** मुंबईसह राज्यातील काही भागांत सुरू केलेल्या मोटार बाइक ॲम्ब्युलन्स सेवेला गुरुवारी २ ऑगस्टल् रोजी एक वर्ष पूर्ण झाले. या कालावधीत एकट्या मुंबईत ३५७४ रुग्णांना तातडीने वैद्यकीय सुविधा मिळाल्या. वर्षभरात मुंबईत वीस तर मेळघाट आणि पालघर येथे प्रत्येकी पाच अशा ३० बाइक ॲम्ब्युलन्स राज्यात रुग्णांना सेवा देत आहेत.

दाटीवाटीची लोकवस्ती आणि अरुंद रस्त्यांच्या समस्येवर मात करत रुग्णांना तातडीने रुग्णालयापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने गेल्या वर्षी २ ऑगस्ट रोजी बाइक ॲम्ब्युलन्सची सुरुवात करण्यात आली. प्रायोगिक तत्त्वावर मुंबईत दहा बाइक देण्यात आल्या. या सेवेला सुरुवात करताच मुंबईतील रेल्वे स्टेशन आणि अरुंद गल्ली, रस्ते येथून वैद्यकीय मदतीसाठी



कॉल येऊ लागले. ज्या भागात चार चाकी रुग्णवाहिका पोहोचण्यास अडचण निर्माण होते अशा ठिकाणी बाइक ॲम्ब्युलन्स सेवा उपयुक्त असल्याचे दिसून येत आहे.

# माहिती अधिकाराचा अर्ज 'ऑनलाइन' स्वीकारणार

**मुंबई-** गेल्या काही वर्षांमध्ये विविध कामांविषयी माहिती मिळविण्यासाठी पालिकेच्या दफ्तरी माहितीचा अधिकार कायद्याखाली मोठ्या संख्येने अर्ज येऊ लागले आहेत. ही बाब विचारात घेऊन पालिका प्रशासनाने माहितीच्या अधिकाराच्या अर्जांसाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. ही सुविधा उपलब्ध झाल्यानंतर माहितीचा अधिकार कार्यकर्त्यांना माहिती मिळविण्यासाठी ऑनलाइनवर अर्ज करता येतील.

गेल्या काही वर्षांमध्ये पालिकेची विविध कामे, प्रकल्प, नागरी सुविधा, तसेच अधिकाऱ्यांशी संबंधित माहिती मिळविण्यासाठी मोठ्या संख्येने माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत पालिकेकडे अर्ज करण्यात येत आहेत.

# भटक्या श्वानांनंतर आता मांजरांची नसबंदी?

**मुंबई-** गेल्या काही वर्षांमध्ये मुंबईमधील वस्त्या, झोपडपट्ट्या, चाळींमध्ये भटक्या मांजरांचा उपद्रव वाढला असून कुत्र्यांप्रमाणे मांजरांचीही नसबंदी करण्यात यावी, अशी मागणी मुंबईकरांकडून करण्यात येत आहे. या मागणीची दखल घेऊन भटक्या श्वानांच्या नियंत्रणासाठी काढण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये भटक्या मांजरांचा समावेश करावा, असे पत्र पालिकेच्या देवनार पशुवधगृह खात्याने ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाला पाठविले आहे. 'ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया'ने मार्गदर्शक तत्त्वांमध्ये भटक्या मांजरींच्या नियंत्रणाचा समावेश केल्यानंतर मुंबईमधील भटक्या मांजरींची नसबंदी करण्याचा मार्ग मोकळा होऊ शकेल, असे पालिका अधिकाऱ्याने सांगितले.



गेल्या काही वर्षांमध्ये मुंबईमध्ये भटक्या मांजरींच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. वस्त्या, झोपडपट्ट्या, चाळींमध्ये भटक्या मांजरींचा मोठ्या प्रमाणावर वावर असतो. भटक्या कुत्र्यांची नसबंदी करून त्यांच्या संख्येवर नियंत्रण करण्याची तरतूद पालिका अधिनियमात करण्यात आली आहे. मात्र भटक्या मांजरींच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी त्यांची नसबंदी करण्याबाबत कोणतीच तरतूद पालिका अधिनियमात नाही. त्यामुळे पालिकेला भटक्या मांजरींच्या वाढत्या संख्येला आळा घालणे शक्य झालेले नाही.

## संपादकीय...

# उद्योजकता हेच प्रगतीचे इंधन



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

'भारतात जो पक्ष सत्तेवर असतो, तो मुक्त अर्थव्यवस्थेचा कट्टर पुरस्कर्ता असतो. मात्र सत्तेवरून पायउतार झाला की मुक्त अर्थव्यवस्थेच्या नावाने बोटे मोडायला लागतो,' हे शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी सांगितलेले मार्मिक सत्य आजही तंतोतंत लागू पडते. पी.व्ही. नरसिंह राव यांनी १९९१ मध्ये खुल्या आर्थिक धोरणांचा पुरस्कार केला, डॉ. मनमोहन सिंग यांनी प्रामाणिकपणे तो राबवला. भाजप आणि संघ परिवाराने त्या वेळी घेतलेली भूमिका आता काँग्रेस बजावत आहे. १९९८ ते २००४ या काळात मुक्त अर्थव्यवस्था राबवणारे भाजपचे नेते २००४ ते २०१४ अशी १० वर्षे विरोधी बाकांवर बसले. मनमोहन सिंग यांच्या प्रत्येक भूमिकेला विरोध करीत राहिले. आता नरेंद्र मोदी यांच्यावर ती वेळ आली असून काँग्रेसच्या नेत्यांनी त्यांना उद्योगपतींचा हस्तक ठरवले. आपण अजूनही समाजवादी अर्थव्यवस्थेच्या मानसिकतेतून बाहेर पडलो नसल्याचे दाखवून देण्यास काँग्रेसने सुरुवात केली आहे.

देशी-विदेशी गुंतवणूकदारांचा ओघ औद्योगिक क्षेत्राकडे वळवणे अपरिहार्य असते. कारण, रोजगार निर्मितीच पक्षाच्या कामगिरीच्या परीक्षणाचा आधार ठरते. त्यासाठी उद्योग उभारणीला गती द्यावी लागते, गुंतवणूकदारांना सोयी-सवलती द्याव्या लागतात, हे विरोधी पक्षांनाही कळते. परंतु सत्ताधारी पक्षाने उद्योगपतींना सवलती दिल्या, गुंतवणूकदारांचे मेळावे घेतले की भांडवलदारांचा हस्तक ठरवणे सोपे जाते. भांडवलदार आणि उद्योगपती समाजाचे शत्रू असतात हे समाजमनावर कोरले गेलेले आहे. नेमकी हीच मन:स्थिती औद्योगिक प्रगतीला मारक ठरते, हे लक्षात घेतले पाहिजे. उद्योजकता हे देशाच्या प्रगतीचे इंधन आहे, उद्योगपती संपत्ती निर्माण करत असतात याकडे दुर्लक्ष कसे करता येईल? भारतात उद्योगपतींनी गुंतवणूक केलीच नाही तर उद्योग कसे उभारले जातील? रोजगार निर्मिती कशी होईल? उद्योगपतींना सुविधा-सवलती व पोषक, सुरक्षित वातावरण दिले नाही तर उद्योग चालणार कसे? विदेशातील सरकार आणि नोकरशाही नवउद्योग उभारणीला प्रोत्साहन देत असल्याचे आपण पाहतो. मात्र भारतात असे काही होत असेल तर त्यात कोलदांडा घालण्याचा प्रयत्न होतो, म्हणजे पायावर धोंडा पाडून घेण्यासारखेच नाही का?



देशाच्या विकासात शेतकरी, कामगार, बँकर्स, सरकारी कर्मचारी आणि अन्य घटकांप्रमाणेच उद्योगपतींचीदेखील तितकीच महत्त्वपूर्ण भूमिका असते. त्यांना चोर-दरोडेखोर ठरवणे योग्य आहे का, हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा युक्तिवाद बिनतोड असला तरी विजय मल्ल्या, नीरव मोदी, ललित मोदी यांच्यासारख्या कैक पळपुट्या आणि कर्जबुडव्यांनीच त्यांना अडचणीत आणले हे कसे नाकारता येईल? 'जे लोक चुकीचे वागतील त्यांना एक तर देश सोडावा लागेल किंवा तुरुंगात खितपत पडावे लागेल' हा नरेंद्र मोदींचा संकेत जितका बोलका आहे, तितकाच सोयीचा अर्थ लावणाऱ्यांसाठीदेखील पुरेसा आहे. आपला हेतू स्पष्ट आणि स्वच्छ असेल तर कुणाहीसोबत उभे राहिलो तरी आपण कलंकित होऊ शकत नाही हे ठसवताना म. गांधींचा दिलेला दाखला उल्लेखनीय ठरावा. म. गांधींचा हेतू स्पष्ट आणि शुद्ध होता त्यामुळे बिर्ला परिवाराशी घनिष्ठ संबंध असले तरी त्यांना कधी संकोच वाटला नाही, हे लक्षात आणून देत मोदी विरोधी पक्षांवर तुटून पडले. ज्यांना जाहीरपणे उद्योगपतींना भेटावेसे वाटत नाही ते पडद्याआड भेटतात, कारण त्यांच्या मनात भीती असते हा मुद्दा लोकमनावर बिंबवण्यामागे पश्चिम उत्तर प्रदेशातील भाजपचा जनाधार वाढवण्याचा त्यांचा अजेंडा स्पष्ट होतो.

गुंतवणुकीच्या ब्लूप्रिंटच्या माध्यमातून रोजगार निर्मिती, शेतकऱ्यांना होणारा लाभ या दोन प्रमुख मुद्द्यांवरून येथील मतदारांना त्याचसोबत व्यापाऱ्यांनाही भाजपकडे खेचण्यासाठी विशेष रणनीती आखली जात आहे. अर्थातच जीएसटी आणि नोटबंदीमुळे उद्भवलेली व्यापाऱ्यांतील नाराजी कमी करणे आणि युवा मतदारांमध्ये रोजगार संधीच्या माध्यमातून बस्तान बसवणे ही त्यामागची भूमिका आहे. देश-विदेशातील उद्योगपती गेल्या काही वर्षांपासून नरेंद्र मोदींना गुंतवणूक आणि विकासाला चालना देणारा नेता म्हणून ओळखत आहेत. त्यामुळे मोदींनी गुंतवणुकीला चालना देणे, प्राधान्य देणे अनपेक्षित मुळातच नाही. परंतु 'संपुआ'च्या पहिल्या टप्प्यात जी उद्योगप्रवणता पाहायला मिळाली तशी मोदींनी खऱ्या अर्थाने दाखवली नाही. त्यामुळे नवे उद्योग आले नाहीत, खासगी गुंतवणूकही वाढली नाही हे तितकेच खरे. परिणामी त्यांची भूमिका शेतकरी, उद्योगपती किंवा मध्यमवर्गीयांच्या हितांची जपणूक करणारी अशी ठळकपणे अधोरेखित होत नाही. मात्र त्यांच्या कार्यकाळात करदाते वाढले, अर्थव्यवस्थेची घडी बसत असताना पाहायला मिळते, ही जमेची बाजू ठरावी.

# मराठा आरक्षणाला आर्थिक निकषाचा फाटा




**राज ठाकरे यांनी पुण्यात आर्थिक निकषावर आरक्षण द्या, अशी भूमिका घेऊन मराठा आरक्षणाला फाटा फोडला आहे. मराठा समाजाला सामाजिक मागासवर्गात घालून आरक्षण द्यावे, अशी सर्व पक्षांची एकी झाली असताना राज यांची विपरीत भूमिका पुढे आली आहे. राज हे उत्तम व प्रभावी वक्ते आहेत. ते त्यांना सांगायचा मुद्दा चमकदार, चटपटीत पद्धतीने सांगतात. पण आरक्षण या मुद्यावर त्यांचं राजकीय शहाणपण तुटपुंजं असल्याचं दिसतं. कारण आर्थिक निकषांवर आरक्षण कुणालाही देता येत नाही, हे सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा स्पष्ट केलंय. सर्व राजकीय पक्षांना ते कळलंय. मग राज ठाकरे आणि त्यांच्या पक्षाला हे का कळू नये?**

आरक्षणाचा प्रश्न आला की, देशातील तथाकथित विचारवंत, माध्यमांतले लोक, ओपिनियन मेकर्स पुन्हा पुन्हा बुद्धिभेद करत आर्थिक निकषाचा मुद्दा पुढे रेटतात. हा मुद्दा पुढे रेटून या लोकांना आरक्षणाला विरोध करायचा असतो. सामान्य माणसांच्या, तरुणांच्या डोक्यात आरक्षणाविषयी असंतोष निर्माण करायचा असतो. आरक्षण रद्द झाले पाहिजे, ही त्यांची मूळ भूमिका असते. ही भूमिका आटोकाट प्रयत्न करून पुढे रेटण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवार आघाडीवर असतो. राज ठाकरे या परिवाराची भाषा बोलत आहेत. त्यांचं पुण्यातलं भाषण हे त्याचं प्रतिबिंब होतं.

मंडल आयोग लागू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या तेव्हाही संघ परिवाराने सामाजिक, शैक्षणिक मागासवर्गाला आरक्षण देऊ नये, अशी विरोध करणारी भूमिका घेतली होती. संघ परिवारातली अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तर मंडल आयोगाच्या विरोधासाठी रस्त्यावर उतरली होती. हिंसक आंदोलनं विद्यार्थ्यांना संघटित करून तेव्हा घडवून आणण्यात आली होती. तेव्हाही आर्थिक निकषावर सर्व गरिबांना आरक्षण द्या, हीच मागणी होती. पण त्याआडून एकूण आरक्षणालाच या लोकांना विरोध करायचा होता. मंडल आयोग लागू केल्यानंतर दंगे उसळले. ते दंगे थांबवण्यासाठी तेव्हाचे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी २५ सप्टेंबर १९९१ रोजी देशातील सवर्णांमधील गरिबांना १०३ आरक्षण दिलं. आर्थिक निकषांवर आरक्षण देण्याची तरतूद संविधानात नाही. म्हणून नरसिंह रावांचा हा निर्णय सर्वोच्च न्यायालयात टिकला नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या ९ न्यायाधीशांच्या बेंचने १६ नोव्हेंबर १९९२ रोजी हा निर्णय घटनाबाह्य ठरवला. इंद्र साहनी विरुद्ध भारत सरकार असा हा खटला होता. त्याला मंडल आयोगाची केस असंही म्हणतात. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा नंतर कायदा होतो. त्याला 'केस लॉ' असंही म्हटलं जातं. हा केस लॉ रद्द करायचा तर पुन्हा नव्याने घटना दुरुस्ती करावी लागते. म्हणूनच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे घटनादुरुस्तीची भाषा बोलत आहेत. आता यातली खरी अडचण न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांनी सांगून ठेवली आहे. न्यायमूर्ती सावंत हे इंद्र साहनी केसमधल्या सर्वोच्च न्यायालयाच्या ९ न्यायाधीशांच्या बेंचमधले एक न्यायमूर्ती होते. न्यायमूर्ती सावंत यांचं म्हणणं असं की, विद्यमान आरक्षण हे जात, जमात व गटकेंद्रित आहे. व्यक्ती यापैकी एका विशिष्ट गटाची आहे. तिच्यावर आजपर्यंत अन्याय झालाय, आजही होत आहे म्हणून तिला आरक्षण दिलेलं आहे. स्वतंत्र व्यक्ती म्हणून दिलेलं नाही. त्या गटाची सदस्य म्हणून दिलेलं आहे.

आर्थिक निकषावर दिलेलं आरक्षण हे व्यक्तिकेंद्रित होते. तिथे समतेच्या तत्त्वाचा भंग होतो. त्यामुळे घटना दुरुस्ती केली तरी आर्थिक निकषांवर आरक्षण देता येणार नाही, असंही न्या. सावंत यांचं मत आहे. हे मत त्यांनी वारंवार मांडलं आहे. तरी राज ठाकरे हे आर्थिक निकषाचं पालुपद वारंवार का लावतात? शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनीही आयुष्यभर हीच भूमिका घेतली होती. बाळासाहेबांनी तर मंडल आयोगाला आणि इतर साऱ्या आरक्षणाला कायम विरोध केला होता. त्यामुळेच सध्या उद्धव ठाकरे यांचीही मराठा आरक्षणाबद्दल स्पष्ट, ठाम काही भूमिका दिसत नाही. तळ्यात-मळ्यात दिसते. आरक्षणामुळे जाती जाग्या होतात. जातीयवाद वाढतो, असं बाळासाहेब सांगत. पण हेच बाळासाहेब सवर्ण जातींकडून इतर दुबळ्या जातींवर होणाऱ्या अन्यायाबद्दल फार बोलत नसत. आपल्या समाजव्यवस्थेत मनूने आरक्षण ठरवून दिलेलं आहे. २८०० वर्षे ते आरक्षण पाळलं जातंय. मनूने या विचित्र प्रकारच्या आरक्षणात जाती व्यवस्था तयार करून व्यवसाय, कामाचं वाटप केलंय. या वाटपात कोणत्या जातीने काय व्यवसाय करायचे हे ठरवून दिलंय. या कामाच्या, व्यवसायाच्या वाटपातून कोण श्रीमंत होणार, कोण गरीब राहणार हे ठरवून दिलंय. आजही देशातले सगळे हलके, कष्टाचे व्यवसाय, धंदे महिला, दलित, आदिवासी आणि इतर मागास वर्गाचे लोक (ओबीसी) हेच करतात. या मनूच्या विकृत आरक्षणाला बाळासाहेब, शिवसेना कधी विरोध करत नसत. तीच परंपरा राज ठाकरे चालवत आहेत.

आजही देशातील संपत्ती, साधनं म्हणजे जमीन, पाणी, ऊर्जा यांची मालकी सवर्ण (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य) जातींकडे आहे. मनुस्मृतीने त्यांना ती बहाल केलीय. त्या मनुस्मृतीचा आणि मनूचा गौरव मनोहर उर्फ संभाजी भिडे म्हणूनच करताना दिसतात. हे मनूचं गौरवीकरण, सवर्णांची संपत्तीवरची मक्तेदारी राज ठाकरे यांना खटकत नाही. मात्र, मराठा समाज आरक्षण मागतो हे त्यांना पटत नाही. आजही सर्व शंकराचार्य, सारी धर्मसत्ता एका विशिष्ट वर्णाच्या हातात आहे, याची चीड राज ठाकरेंना येत नाही. शंकराचार्य, मंदिरातले पुजारी आर्थिक निकषांवर निवडावेत, असं राज ठाकरेंना वाटत नाही. मात्र, आरक्षण आर्थिक निकषांवर द्यावं, अशी भाषणबाजी ते ठोकतात, हे अतर्क्य नाही काय? संविधानाने आरक्षण दिले नसते तर आज राजसत्ता, प्रशासन सत्ता, न्यायसत्ता इथं महिला, एससी, एसटी, ओबीसींना आज जे स्थान मिळालेले दिसते ते तरी मिळाले असते काय? राज ठाकरे यांच्या आणि आर्थिक निकषांचं दळण दळणाऱ्यांच्या हे लक्षात येत नसेल काय? की त्यांना जाणूनबुजून याकडे दुर्लक्ष करून आरक्षण संपलं पाहिजे यासाठी हे प्रयत्न जारी ठेवायचे आहेत?

## पाण्याअभावी नवी मुंबईकरांचे हाल

**नवी मुंबई-** नवी मुंबई महापालिकेचे मोरबे धरण गेल्या आठवड्यातच भरल्याने आता वर्षभरासाठी पाण्याची चिंता मिटली, असे म्हणत समाधान व्यक्त करणाऱ्या नवी मुंबईकरांचे



आठवड्याच्या पहिल्याच दिवशी पाण्याअभावी हाल झाले. भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रातील विजेचा दाब अचानक वाढल्यमुळे तांत्रिक बिघाड होऊन संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा खंडित झाला. मोरबे धरणातून पाणीपुरवठा होणाऱ्या कामोठे व इतर भागांतही नागरिकांचे त्यामुळे हाल झाले. नवी मुंबई शहराला दररोज मुबलक पाणीपुरवठा केला जातो. मोरबे धरणातून दिवसाला ४२० एमएलडी पाणी शहरासाठी घेतले जाते. या धरणातून घेण्यात येणाऱ्या पाण्याच्या शुद्धीकरणासाठी भोकरपाडा येथे शुद्धीकरण केंद्र आहे. या केंद्रातील विजेचा दाब सोमवारी अचानक वाढला. त्यामुळे सीटी अर्थात करंट ट्रान्स्फॉर्मर पहाटे चारच्या सुमारास जळाला. परिणामी सकाळी शहराला अत्यल्प प्रमाणात पाणीपुरवठा झाला. त्यानंतर येथे दुरुस्तीचे काम सुरू झाल्यामुळे दिवसभर शहरात पाणीपुरवठा झालाच नाही. त्यामुळे नवी मुंबई महापालिकाक्षेत्रातील बेलापूर, नेरुळ, वाशी, सानपाडा, ऐरोली, दिघा अशा सर्वच विभागांतील नागरिकांचे पाण्याअभावी हाल झाले. कार्यालय गाठण्याच्या गडबडीत असलेल्यांची तारांबळ उडाली. महापालिकेने तात्काळ दुरुस्ती हाती घेतली. परंतु पुन्हा तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने काम लांबले. शहरात नेहमीच पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत असल्यामुळे घरात पाणी साठवले जाण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

## लोकलध्ये पुन्हा जागेवरुन दादागिरी

**विरार-** लोकल ट्रेनच्या दारात उभे राहून जागा अडविणे, इतर प्रवाशांना चढू न देणे याचबरोबर आता रुमाल टाकून जागा अडविण्याचे प्रकारही लोकलमध्ये वाढू लागले आहेत. त्याच्या अनेक तक्रारी रेल्वे पोलिसांकडे येत आहेत. अशा जागा पकडणाऱ्यांच्या विरोधात रेल्वे पोलिसांनी पुन्हा विशेष मोहीम सुरू करण्याचे ठरवले आहे. विरार लोकलमधून दररोज लाखो प्रवासी मुंबईला प्रवास करत असतात. मात्र जागा अडविण्याचे प्रकार वारंवार होत असतात. यामुळे मागील काही महिन्यांत प्रवाशांमध्ये अनेक वाद होत असून बरेच वेळा या वादाला हिंसक वळण येत असल्याने मारामारीच्या घटनाही घडल्या होत्या. आता पुन्हा अशा सीट माफियांचे प्रकार वाढत असल्याच्या तक्रारी प्रवाशांनी केल्या आहेत. विरारहून चर्चगेटच्या दिशेने पहाटे सुटणाऱ्या लोकल ट्रेनमध्ये काही प्रवासी आपल्या सहकाऱ्यांसाठी चक्क सीटवर रुमाल, बॅग, किंवा पाण्याच्या बाटल्या ठेवून जागा अडवून बसतात. त्यामुळे



सामान्य प्रवासी आणि गटातील प्रवासी यांच्यात जागेवरून वाद वाढत आहेत. विरारमध्ये सध्या जागा मिळवण्यासाठी रुमाल टोळीची दहशत बघायला मिळत आहे. अनेक प्रवाशांचे गट नालासोपाराहून उलटे प्रवास करून विरारला येतात. ते स्वत: जागा अडवतातच, परंतु रुमाल, पाण्याची बाटली आणि बॅगा ठेवून आपल्या सहकाऱ्यांसाठीही जागा अडवत असतात.

## बांगलादेशी घुसखोरांच्या संख्येत वाढ

**नवी मुंबई-** खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा आणि नवीन पनवेल परिसरात सुरू असलेल्या वाढत्या बांधकामांमुळे महामुंबई क्षेत्रात बांगलादेशी घुसखोरांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. नवी मुंबई पोलिसांनी केलेल्या सर्वेक्षणात हे प्रमाण ४५० पर्यंत गेल्याचे स्पष्ट झाले आहे. जानेवारी २०१२ मध्ये हेच प्रमाण केवळ २०२ एवढे होते. नवी मुंबईत कामानिमित्ताने आलेल्या ५० अफ्रिकन नागरिकांनी त्यांच्या वास्तव्याची माहिती पोलीस आयुक्तालयाला दिली आहे, पण एकाही बांगलादेशी नागरिकाने पोलिसांकडे अधिकृत नोंद केलेली नाही. मुंबईतील बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महामुंबई क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू असून बांधकाम मजूर म्हणून मोठ्या प्रमाणात बांगलादेशी नागरिक आहेत. हे कामगार कमी



वेळात पूर्णवेळ उपलब्ध होत असल्याने बांधकाम कंत्राटदार हे मजूर पश्चिम बंगालमधून मोठ्या प्रमाणात आणत असल्याचे कळते. सुरक्षारक्षक, घरकामगार महिला, बारमध्ये काम करण्यास महिलांमध्ये बांगलादेशींचे प्रमाण जास्त आहे. गतवर्षी कोपरखैरणे सेक्टर १९ मधून नऊ बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आली होती. सर्व प्रक्रिया करून त्यांना पुन्हा त्यांच्या देशात पाठविण्यात आले, पण हे नागरिक पुन्हा देशात येत असल्याचे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

मुंबई पोलीस दलातील काही अधिकारी दोन वर्षांपूर्वी खारघर येथे बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यास गेले असता त्यांच्यावर दगडफेक करण्यात आली होती. त्यात दोन अधिकारी जबर जखमी झाले होते.

## बोळिंज येथे विहिरीत गरम पाणी

**बोळींज-** वज्रेश्वरी आणि गणेशपुरी येथील गरम पाण्याचे झरे प्रसिद्ध आहेत. तशाच प्रकारचे पाणी विरार पश्चिमेकडील बोळिंज येथील एका विहिरीला लागले आहे. या पाण्याला उग्र वास येत असल्याने ग्रामस्थांनी पाहणी केली असता विहिरीत गरम पाणी आढळले. हे पाणी अचानक गरम कसे झाले, याबाबत ग्रामस्थांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. बोळिंज येथील भंडार आळीत ४५ वर्षे जुनी विहीर आहे. ही विहीर ११ वर्षांपूर्वी बंदिस्त करण्यात आली होती. तब्बल २० फूट खोल असलेल्या या विहिरीवर दोन चेंबर लावण्यात आले होते. मात्र रविवारी सकाळी येथून वाफ निघत असल्याने गावकऱ्यांनी तात्काळ अग्निशमन दलाला बोलावले. अग्निशमन अधिकारी दिलीप पालव सहकाऱ्यांसह घटनास्थळी आले असता त्यांना या विहिरीचे पाणी गरम असल्याचे आढळले.

## वसईत केवळ २५० खड्डे!

**वसई-** वसई-विरार शहरातील महापालिकेच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर केवळ २५० खड्डे असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे. हे खड्डे बुजवण्यासाठी महापालिकेने प्रथमच आरएमसीचा (रेडी मिक्स्ड काँक्रीट) वापर करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे पाऊस असतानाही खड्डे बुजवणे शक्य होणार आहे. खड्डे बुजवण्यासाठी महापालिकेने यंदा ४० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पावसामुळे वसई-विरार शहरात जागोजागी खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, तर विविध संघटना आणि पक्षांनी खड्डे बुजवण्याची मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला आहे. महापालिकेने मात्र शहरात केवळ २५० खड्डे असल्याचा दावा केला आहे. शहरातून चार प्रमुख मोठे रस्ते असून ते राज्य महामार्ग आहेत. ते सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत येतात, असे पालिकेचे कार्यकारी अभियंता राजेंद्र लाड यांनी सांगितले. वालीव नाक्यापासून वसई तहसीलदार कार्यालय, नालासोपारा ते निर्मळ, विरार फाटा ते अर्नाळा आणि सातिवली फाटा ते गोखिवरे रेंज ऑफिस आदी चार रस्ते सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत



येतात आणि त्या रस्त्यावर खड्डे असल्याचे लाड यांनी सांगितले. हे रस्ते वगळता शहरातील इतर रस्त्यांवर केवळ २५० पेक्षा कमी खड्डे आहेत, असे ते म्हणाले. खड्डे बुजवण्यासाठी पालिकेने यंदाच्या अर्थसंकल्पात ४० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

## बेकायदा इमारतीच्या नोंदणीकरणासाठी भूमाफियांची धावाधाव

**डोंबिवली-** कल्याण-डोंबिवलीतील २७ गावांच्या हद्दीतील बेकायदा इमारतींमधील सदनिकांचे नोंदणीकरण महसूल विभागाने तातडीने बंद केले आहे. त्यामुळे चवताळलेल्या काही भूमाफिया-विकासकांनी हे नोंदणीकरण पुन्हा सुरू करण्यासाठी कल्याण डोंबिवलीतील काही आमदार, खासदार यांच्या भेटी घेऊन नोंदणीकरण पुन्हा सुरू करावे, अशी गळ घालण्यास सुरूवात केली आहे. २७ गावांच्या हद्दीत विकासक, काही भूमाफियांनी पालिका, 'एमएमआरडीए' 'एमआयडीसी' यांच्या बांधकाम परवानग्या न घेता जमिनीची बोगस कागदपत्र, बनावट अकृषिक परवानग्या, पालिकेच्या बोगस परवानग्यांची खोटी कागदपत्र तयार



करून सात माळ्याच्या इमारती उभ्या केल्या आहेत. या बोगस नोंदणीकरणाची यापूर्वी मुख्यमंत्री, महसूल प्रधान सचिव यांच्याकडे तक्रार करण्यात आल्यानंतर काही महिने बेकायदा इमारतींमधील सदनिकांचे खरेदी व्यवहारांचे डोंबिवलीतील दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदणीकरण बंद होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून काही दलाल, भूमाफियांनी मोठे व्यवहार करून हे नोंदणीकरण पुन्हा सुरू केले आहे. या बोगस नोंदणीकरणाची ४० हून अधिक कागदपत्र 'लोकसत्ता'कडे आहेत. मात्र दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्याने या सगळ्या प्रकाराचा इन्कार केला आहे. असा कोणताही प्रकार येथे घडत नसल्याचे या अधिकाऱ्याचे म्हणणे आहे. २७ गाव परिसरात एकूण सुमारे ४०० विकासक आहेत. नोंदणीकरण सुरू करण्यासाठी प्रत्येक विकासकांकडून दलालांनी पाच हजार रूपये जमा करून २० लाखाचा दौलतजादा केला आहे.

# कुणीही उठतो अन् आग लावतो, राज्यात सरकार आहे की नाही



**मुंबई-** राज्यात सध्या काय सुरू आहे? कुणीही उठतो आणि बसेसना आग लावतोय, पोलिसांवर दगडफेक केली जात आहे. कुणालाही काहीही करण्याची मुभा दिली आहे का? या राज्यात सरकार नावाची यंत्रणा अस्तित्वात आहे का? सरकारचे प्राधान्य नेमके कशाला आहे, असा सवाल करत उच्च न्यायालयाने गुरुवारी राज्य सरकारची चांगलीच खरडपट्टी काढली.

डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि कॉ. पानसरे यांच्या हत्येच्या तपासात समाधानकारक प्रगती नसल्याबाबतची याचिका दोन्ही कुटुंबीयांच्या वतीने उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली असून न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी आणि भारती डांगरे यांच्या खंडपीठासमोर याबाबत सुनावणी सुरू आहे.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती म्हणाले, या देशात सध्या अस्थिरतेचे वातावरण असून एखादी सर्वसामान्य व्यक्ती स्पष्टपणे बोलू शकत नाही किंवा मुक्तपणे वावरू शकत नाही. त्याचे कसलेही सोयरसुतक नसल्याप्रमाणे तपास यंत्रणा मात्र सुस्तपणा दाखवत आहेत.



डॉ. दाभोलकर आणि कॉ. पानसरे यांच्या तपासादरम्यान सीबीआय आणि विशेष तपास पथक दाखवत असलेल्या निष्क्रियतेवर न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. १७ जुलै रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी तपासाबाबत काही गोपनीय बाबी आपल्याला न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत, असा दावा करत सीबीआय आणि विशेष तपास पथकाने न्यायमूर्तींच्या दालनात सुनावणी व्हावी अशी मागणी केली होती. मात्र, भविष्यात तशी प्रथा पडू नये यासाठी न्यायालयाने दालनात सुनावणीची परवानगी नाकारत तपास अहवाल सादर करण्याची मुभा दिली होती. त्यानुसार सादर झालेल्या अहवालावर न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.

या अहवालात नवीन काही नसून आतापर्यंत वेळोवेळी सादर केलेल्या अहवालांचा गोषवारा असल्याचे न्यायालयाने सांगितले. तसेच हा अहवाल पाहून आपला भ्रमनिरास झाल्याचे नमूद करत अहवालात काहीही गोपनीय नसल्याचे सांगत न्यायालयाने हा अहवाल तपास यंत्रणांना परत केला.

## सरकार मराठा आरक्षणाबाबत सकारात्मक

**मुंबई-** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभर पसरलेलं आंदोलनाचं लोण लवकरात लवकर शमवण्यासाठी बैठकांचा सिलसिला सुरू आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांची मतं जाणून घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी सह्याद्री अतिथीगृहावर महत्त्वाची बैठक बोलावली होती. जवळपास ३ तास चाललेल्या या बैठकीला साहित्य, कला, उद्योग, कृषी, यासह इतर महत्त्वाच्या क्षेत्रातल्या दिग्गजांनी आवर्जून हजेरी लावली. मंत्र्यांपैकी चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, पंकजा मुंडे, एकनाथ शिंदे यांनी हजेरी लावली. मराठा समाजाला कालबद्ध आरक्षण देण्याचा पुनरूच्चार करीत, सरकार आरक्षणाबाबत सकारात्मक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. मराठा समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातल्या मान्यवरांसोबत अडीच तास चाललेल्या या बैठकीत, न्यायालयीन लढाईपासून ते नोकरी शोधण्याच्या मुद्यांपर्यंत उहापोह करण्यात आला. सह्याद्री अतिथीगृहात पार पडलेल्या या बैठकीत मराठा समाजाला कालबद्ध आरक्षण देण्याचा पुनरूच्चार करीत मुख्यमंत्र्यांनी सरकार आरक्षणाबाबत सकारात्मक असल्याचे स्पष्ट केले. यावेळी नोकरीच्या संधी कुठे उपलब्ध आहेत? देशविदेशात खासगी आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये कसं सामावून घेता येईल? केंद्र आणि राज्याच्या योजनांचा लाभ मराठा तरुणांना कसा देता येईल? या विषयांवर अडीच तास चर्चा करण्यात आली.



## मराठा आंदोलनातील समाजकंटकांच्या बंदोबस्तासाठी केंद्रातून मागवली कुमक

**परळी-** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभर आक्रमक आंदोलने सुरू आहेत, मात्र त्याचा गैरफायदा काही समाजकंटक घेत आहेत. राज्यात अस्थिरता निर्माण करण्याचा त्यांचा डाव असल्याचा सरकारला संशय आहे. नवी मुंबईतील आयोजकांनीही हा संशय व्यक्त केला होता. या समाजकंटकांचा 'बंदोबस्त' करण्यासाठी आता केंद्राची मदत घेतली जाणार आहे.

राज्यात ९ व १६ ऑगस्ट रोजी मोठी आंदोलने होणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) सुनील पोरवाल यांनी केंद्रीय गृहसचिवांना पत्र पाठवून केंद्रीय सशस्त्र दलाच्या 'स्पेशल १६' तुकड्या राज्यात पाठवण्याची विनंती केल्याची माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, सरकार सर्व खबरदारी घेत असल्याची माहिती गृह राज्यमंत्री दीपक केसरकर यांनी दिली.



राज्यातील आंदोलने आता थांबवावीत, असे आवाहन परळीतील मराठा क्रांती मोर्चाच्या राज्यस्तरीय बैठकीत करण्यात आले.

## ...तर भाजपच्या हिंमतीची डी.एन.ए. चाचणी करावी लागेल


**मुंबई-** राष्ट्रीय नागरिक नोंदणीच्या (एनसीआर) मुद्यावरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सुरु असलेल्या वादात आता शिवसेनेनेही उडी घेतली आहे. आसाममधून विदेशी नागरिकांना बाहेर काढत असताना दीड लाख कश्मिरी हिंदू पंडितांची काश्मीरमध्ये घरवापसी करण्याची हिंमत सरकार दाखवेल काय?, असा सवाल शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'तून उपस्थित करण्यात आला आहे. आसाममधील ४० लाख घुसखोरांना देशाबाहेर काढण्यासाठी भाजप सरकारने कंबर कसली आहे. भाजप अध्यक्ष अमित शहा यांच्या भाषेत सांगायचे तर काँग्रेस सरकारांना जे जमले नाही ते हिमतीचे काम आम्ही करीत आहोत. परकीय नागरिकांना वेचून बाहेर काढण्याचे काम देशभक्तीचेच आहे व अशी हिंमत दाखवल्याबद्दल आम्ही केंद्रीय सरकारचे अभिनंदन करतो, असे सेनेने म्हटले आहे. मात्र, केंद्र सरकार आसामचा न्याय काश्मीरमध्येही लावणार का, असा सवालही शिवसेनेने विचारला आहे. आसामातील ४० लाख परकीय नागरिकांनी त्या राज्याचा भूगोल, इतिहास व संस्कृती मारून टाकली आहे. हा प्रश्न फक्त प्रखर हिंदुत्वाचा नाही, तर आसामातील घुसखोरांइतकाच राष्ट्रीय सुरक्षा व हिंदू संस्कृतीशी जोडलेला आहे. ४० लाख परकीय नागरिकांना क्षणात बाहेर काढणारे केंद्र सरकार हिंदू रक्ताच्या दीड लाख स्वदेशी नागरिकांना कश्मीरात पाठवू शकत नसेल तर या हिमतीची डी.एन.ए. चाचणी करावी लागेल, असा खोचक टोला शिवसेनेने लगावला आहे.



## थोडक्यात

### पासपोर्ट मिळवण झाल सोपं, पोलीस तपासणी होणार शिथील

**मुंबई-** पासपोर्ट मिळण्यात पोलिसांकडून होणाऱ्या तपासणीमुळे सर्वाधिक विलंब होतो. आता पासपोर्ट विभाग या प्रक्रियेत बदल करणार असून, मोजक्याच प्रकरणात पोलीस अर्जदाराच्या घरी जातील. इतर प्रकरणात त्यांना अर्जदाराच्या घरी जाण्याची गरजच भासणार नाही. यासाठी पासपोर्ट विभाग सर्व राज्यांच्या पोलिसांकडून गुन्ह्यांची माहिती मिळण्यासाठी चर्चा करीत आहे. त्यामुळे ज्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्यास लवकर पासपोर्ट मिळू शकेल. अर्ज करणाऱ्यास एक ते तीन दिवसांत पासपोर्ट मिळावा, असे विभागाचे प्रयत्न आहेत.



सध्या आधार क्रमांक देणाऱ्यास पासपोर्ट दिल्यानंतरही तपासणी केली जाते, पण राज्यांकडील गुन्ह्यांच्या माहितीद्वारेच अर्जदाराच्या थेट तपासणीचा प्रयत्न पासपोर्ट विभाग करीत आहे. शेजाऱ्याकडे जाऊन अर्जदाराची माहिती मिळविणे वा अर्जदार एकाच पत्त्यावर तीन वर्षे राहतो आहे का, हे पाहणे हे नियम शिथिल केले आहेत.

### भारतातील लोकसभा निवडणुकीत रशियाच्या हस्तक्षेपाची भीती

**नवी दिल्ली-** भारतात होणाऱ्या आगामी लोकसभा निवडणुकीत रशियाकडून हस्तक्षेप करण्याची शक्यता ऑक्सफर्ड तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. महत्वाचं म्हणजे तज्ज्ञांनी हा दावा अमेरिकी खासदारांसमोर केला. भारत आणि ब्राझीलसह अन्य काही देशांमध्ये आगामी काळात निवडणूका होणार आहेत. मीडियाच्या माध्यमातून रशिया या निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करु शकतं, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. रशियाच्या हॅकर्स आणि गुप्तहेर यंत्रणांनी २०१६ साली अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत हस्तक्षेप करून डोनाल्ड ट्रम्प यांना निवडून येण्यास मदत केली, असा आरोप करण्यात आला होता. याप्रकरणी, अमेरिकेची तपास यंत्रणा एफबीआयने १३ रशियन नागरिकांविरोधात काही दिवसांपूर्वी आरोप निश्चित केले. बेकायदेशीरपणे अमेरिकेच्या निवडणुकीत हस्तक्षेप केल्याचा आरोप या लोकांवर करण्यात आला. तंत्रज्ञानाचा वापर करून धोका देणं आणि खोट्या ओळखीचा वापर करणं, अशा स्वरूपाचे आरोप तिघांवर आहेत. याशिवाय ३ रशियन कंपन्यांवरही आरोप आहेत.



### भारत सरकार, पोलिसांच्या मंजुरीनंतरच मेहुल चौकसीला मिळाले ॲन्टिग्वाचे नागरिकत्व!

**नवी दिल्ली-** पंजाब नॅशनल बँक फ्रॉड प्रकरणी फरार असलेला हिरे व्यापारी मेहुल चौकसीच्या ॲन्टिग्वा येथील नागरिकत्वावर धक्कादायक खुलासा झाला आहे. मेहुल चौकसीला एंटिग्वाचे नागरिकत्व मिळवून देण्यासाठी परराष्ट्र मंत्रालय आणि पोलिसांचे अधिकृत क्लिअरेन्स मिळाले होते. त्यानंतरच त्याला नागरिकत्व देण्यात आले असा खुलासा ॲन्टिग्वा सरकारने केला. त्याला परराष्ट्र मंत्रालयाच्या मुंबई येथील प्रादेशिक कार्यालयाने मंजुरी दिली होती. त्यावेळी आम्हाला कुणीही विरोध केला नाही असेही ॲन्टिग्वा सरकारने स्पष्ट केले. चौकसीने मे २०१७ मध्ये ॲन्टिग्वाचे नागरिकत्व घेण्यासाठी अर्ज दाखल केले होते.



## राज्यात १६ बनावट व बोगस अभियांत्रिकी महाविद्यालये

**भोपाल-** देशात एकूण २७७ बनावट व बोगस अभियांत्रिकी महाविद्यालये असून त्यांतील ६६ दिल्लीत आहेत, अशी माहिती मनुष्यबळ विकासमंत्री सत्यपाल सिंह यांनी लोकसभेत दिली. यामध्ये तेलंगण, पश्चिम बंगाल या राज्यांत अनुक्रमे ३५ व २७ बनावट अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण मंडळ म्हणजे एआयसीटीईच्या मान्यतेशिवाय या संस्था चालवल्या जात असून त्या बेकायदेशीर व बनावट आहेत. कर्नाटक २३, उत्तर प्रदेश २२, हरयाणा १८, महाराष्ट्र १६ व तमिळनाडू ११, दिल्ली ६६, हिमाचल प्रदेश १८, बिहार १७, गुजरात ८, आंध्र ७, चंडीगड ७, पंजाब ५, राजस्थान ३, उत्तराखंड ३ याप्रमाणे बनावट अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या आहे. लोकसभेत एका लेखी प्रश्नाच्या उत्तरात सिंह यांनी म्हटले आहे की, या संस्थांना एक तर एआयसीटीईची परवानगी घ्यावी किंवा महाविद्यालये बंद करावीत असे दोनच पर्याय देण्यात आले आहेत. बनावट शिक्षण संस्थांविरोधात कारवाई करण्याचे आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने याप्रकरणी दिले असून आयोगाच्या संकेतस्थळावर २४ बोगस विद्यापीठांची यादी आहे.

## नेहरु आणि मनमोहन सिंग यांना जमले नाही, ते मोदींनी करुन दाखवले- सुषमा स्वराज

**अस्ताना-** भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांच्यापासून डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारपर्यंत कोणालाही अनिवासी भारतीयांशी प्रभावीपणे संवाद साधता आला नव्हता. मात्र, मोदी सरकारने हे करुन दाखवले, असे मत परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनी व्यक्त केले. त्या गुरुवारी कझाकिस्तानमधील भारतीय जनसमुदायासमोर बोलत होत्या. यावेळी सुषमा स्वराज यांनी म्हटले की, भाजपने अनिवासी भारतीयांविषयी जी आस्था दाखवली, ती यापूर्वी कधीच दिसली नव्हती. पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यापासून ते डॉ. मनमोहन सिंग यांच्यापर्यंत कोणत्याही भारतीय पंतप्रधानांनी विदेशातील भारतीय जनसमुदायासाठी सभा घेतल्या नसल्याचे स्वराज यांनी म्हटले. तसेच भारतीय परराष्ट्र मंत्रालय अनिवासी भारतीयांच्या मदतीसाठी २४ तास उपलब्ध असल्याचे स्वराज यांनी सांगितले. विदेशातील भारतीय दूतावासांसाठी मी 'होम अवे फ्रॉम होम' हे उद्दिष्ट ठरवले आहे. मात्र, केवळ बोलून ते प्रत्यक्षात साध्य होईल, असे नाही. त्यामुळे मी ट्विटरवरुन सातत्याने लोकांशी संवाद साधत असते, असे स्वराज यांनी सांगितले.



## रेल्वेतील कर्मचारी भरतीत ३३ हजार पदे वाढवली; ऑनलाइन परीक्षा ९ ऑगस्टपासून

**अजमेर-** रेल्वे विभागातील सहायक लोको पायलट आणि तंत्रज्ञ भरतीसाठी अर्ज करणाऱ्या ४७.५६ लाख उमेदवारांसाठी खुशखबर आहे. सरकारच्या वतीने २६,५०० पदांची वाढ करण्यात आली असून आता ६० हजार पदांची भरती होणार आहे. रेल्वेमंत्री पीयूष गोयल यांनी ट्विटद्वारे ही माहिती दिली. रेल्वे विभागात नोकरीच्या संधी वाढवण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतल्याचे त्यांनी म्हटले. अजमेर येथील रेल्वे भरती मंडळाचे अध्यक्ष आलोककुमार मिश्र म्हणाले की, रेल्वे मंडळाच्या वतीने ९ ऑगस्टला संगणकावर आधारित परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षेसाठी तयारी अंतिम टप्प्यात आहे. रेल्वे विभागाच्या वतीने उमेदवारांना परीक्षा कुठल्या शहरात असेल याची माहिती दिली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने सध्या हॉलतिकीट जारी केलेले नाहीत. उमेदवार ५ ऑगस्टला हॉलतिकीट डाऊनलोड करू शकतील. परीक्षेत ७५ प्रश्न असतील.




## करोडपती बननण्यासाठी छापलं खोटं तिकीट, पोलिसांनी टाकलं कोठडीत

**कल्याण-** आपल्याला लॉटरीचं तिकीट लागलं असं सांगून पेपरमध्ये बातमी छापून आणत सहानभूती मिळवणाऱ्या 'तो' भाजी विक्रेता-टेम्पो ड्रायव्हर हा बनाव करत होता हे आता सिद्ध झालं आहे. करोडपती बनण्यासाठी त्यानं खोट तिकीट छापल्याचं आता सिद्ध झालं असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. झटपट श्रीमंत होण्यासाठी कोण काय करेल याचा नेम नाही. असाच एक भन्नाट प्रकार कल्याण पोलिसांनी अघडकीस आणला आहे. नालासोपारा येथे राहणारा सुहास कदम याने काही दिवसांपूर्वी कल्याणच्या महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात एका लॉटरी तिकीट विक्रेत्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. आपल्याला एक कोटी ११ लाख रुपयांची लॉटरी लागली असून, आता मात्र लॉटरी कंपनी हे तिकीट बनावट असल्याचं सांगत असल्यानं लॉटरी विक्रेत्यानेच आपली फसवणूक केल्याचा आरोप सुहासने केला होता. कल्याण पोलिसांनी त्यानुसार लॉटरी तिकीट विक्रेत्यांवर गुन्हा दाखल करत त्याला अटकही केली. मात्र पोलिसांच्या तपासात वेगळीच माहिती पुढे आली.




## जनतेत जाऊन सरकारची भूमिका मांडा

### मुख्यमंत्र्यांचे भाजप आमदारांना निर्देश

**मुंबई-** मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाचा राजकीय फायदा उठवण्याचा प्रयत्न काही विरोधक करत आहेत. त्यामुळे आंदोलनात सहभागी होऊन सरकारची भूमिका लोकांपर्यंत पोचवा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पक्षाच्या आमदारांना दिल्या. मराठा आंदोलन चिघळल्याने भाजपची अडचण झाली असून या पेचातून कसा मार्ग काढायचा याबाबत विचारविनिमय करण्यासाठी आज भाजपच्या आमदारांची बैठक बोलवण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षण मंत्री विनोद तावडे, पंकजा मुंडे व पक्षाचे सर्व मंत्री या बैठकीस उपस्थित होते. ग्रामीण भागातील आमदारांनी तेथील परिस्थितीबाबत माहिती देताना मराठा आरक्षणाचा निर्णय लवकरात लवकर घेण्याची मागणी केली. यावेळी बोलताना, सरकार मराठा आरक्षणाबाबत सकारात्मक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मात्र, हे आरक्षण न्यायालयाय टिकावे यासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जात आहे. त्यामुळे थोडा वेळ लागला तरी हे आरक्षण न्यायालयात टिकेल, हे लोकांपर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. आंदोलन चिघळवून भाजप मराठा समाजाच्या विरोधात असल्याचा अपप्रचार विरोधक करत आहेत. मराठा समाजात जाणीवपूर्वक गैरसमज पसरवले जात आहेत. त्यामुळे आंदोलनात सहभागी होऊन सर्वांना वस्तुस्थिती समजावून सांगा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.






आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)